नियमित दिवाणी दावा क्र. २९०/२०२३
लिंबुनाथ काथवटे वि. नामदेव शिंदे व इतर
CNR No. MHSO07-000350-2023

## निशाणी क्र. ०५ वरील आदेश

वादीने सदरचा दावा निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ व नियम १ व २ खाली प्रतिवादी यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई हूकूम मिळणेकरीता दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णनः–**

३. मौजे पळशी येथील गट नं.७२५ क्षेत्र ४ हे. ९ आर. (सदरहू मिळकतीस सोयीकरीता 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.)

**प्रस्तुत अर्जाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणेः–**

४. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत वादीच्या प्रत्यक्ष मालकी वहिवाटीची असून सदर मिळकतीचा उपभोग वादी घेत आहे. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कोणताही हक्क हितसंबंध नाही. दावा मिळकतीच्या पूर्व बाजूला दक्षिणोत्तर चालीचा बांध असून सदर बांधाच्या पूर्व बाजूस प्रतिवादींच्या मालकीचा गट क्र.७२८ आहे. प्रतिवादींना वादीचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे प्रतिवादीने दावा मिळकतीच्या पूर्वेकडील बाजूच्या दक्षिणोत्तर चालीचा बांध फोडून दावा मिळकतीमध्ये पूर्व बाजूने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न मागील तीन ते चार महिन्यांपासून सुरु केला आहे. वादीने प्रतिवादींना समजावून सांगितले, परंतू

प्रतिवादी ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत, त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी जाणार असल्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी यांच्याविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकुमाचे आदेश होणेची विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र.६ हे या दाव्याच्या कामी समन्स बजावणी होऊन देखील हजर न झाल्यामुळे सदरचे प्रकरण त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्याचे आदेश नि.क्र.०१ खाली पारित करण्यात आले आहे.

६. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.क्र.२५ कडे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज संपूर्णतः नाकारला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांच्या मालकीचा गट क्र.७२६ या मिळकतीचे लहान लहान हिश्यामध्ये विभाजन झाले आहे. त्यांचा गैरफायदा घेऊन वादी नेहमीच प्रतिवादी यांना या ना त्या कारणावरुन त्रास देत आला आहे. वादी यांनी त्यांच्या जमीनीतून प्रतिवादींच्या जमीन गट क्र.७२६/२ब/४ या मिळकतीमध्ये येणारा भाडगर धरणाच्या पाण्याचा दंड मोडून टाकला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कॅनॉलचे पाणी बंद झालेले आहे. प्रतिवादी हे वादी यांना हरकत अडथळा करत नाहीत याचा गैरफायदा घेऊन वादीने मे २०१६ पासून प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये पश्चिम बांधाच्या लगत सुमारे २० फूट अतिक्रमण केले आहे व हळूहळू त्यांच्या बांधाची हद्द वाढवून दावा मिळकत वाढवू लागला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादी यांच्या विरुध्द रे.मु.नं.४५५/२०१७ हा दावा दाखल केला आहे. सदरची बाब वादीने न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने कोर्टासमोर

आलेला नाही. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

७. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. माझ्या समोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांच्या बाजूने प्रथम दर्शनी प्रकरण आहे का ? | नाही. |
| २ | न्यायाच्या हक्काचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | नाही. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हूकूम न दिल्यास वादी यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

**मुद्दा क्र. १ ते ३ करिताः-**

८. वादी असे कथन करतो की, प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये पूर्वेकडील बाजूने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच प्रतिवादींनी बांध फोडून त्याची माती स्वतःच्या जमिनीमध्ये समाविष्ठ केली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात यावे अशी विनंती केली. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ नि.क्र.०४ सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी यांच्या मिळकतीचे ७/१२ उतारे देखील हजर केले आहेत. वादीने दाखल केलेला अर्ज, प्रतिज्ञापत्र व ७/१२ उतारा यांचे अवलोकन केले

असता वादी म्हणतो त्याप्रमाणे, प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करत आहेत असे सकृतदर्शनी दिसून येत नाही. वादीने त्याबाबतीत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा याकामी दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या पूर्व बाजूने अतिक्रमण केले आहे ही बाब अभिलेखावर आणण्याकरिता कोणताही कागदपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. वादी त्याच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे हे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नाही. तसेच तूर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेस पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी दर्शवित आहे व मुद्दा क्र.४ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Priyanka Namdev Pathade
Digitally signed by Priyanka Namdev Pathade
Date: 2023.12.22 17:25:34 +0530

**(पी.एन.पठाड)**

दिनांकः– २०.१२.२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर.

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 20.12.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 22.12.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 22.12.2023 |